
मासिकांक २७

दिनांक: ३० सप्टेंबर २०२२

# "ती"चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी



संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# || श्रेय नामावली ||

| | |
|---|---|
| प्रबंध संचालिका व संपादक | सौ. सायली अक्षय देशपांडे |
| अतिथी संपादक व मार्गदर्शिका | सौ. शुभा साठे |
| मुखपृष्ठ, अंक मांडणी व सजावट | अक्षय देशपांडे |
| टीम “ती”चं पान | |
| | तृष्णा आंबेकर |
| | अपूर्वा भालेराव |
| | रेणुका  देशपांडे |
| | दिशा टिकेकर |
| | मृण्मयी सारंग |
| | भार्गवी बाबरेकर |
| | निर्मिती देवलसी |
| | संजीवनी मराठे |
| | स्वर्णिमा प्रकाश |
| | प्राजक्ता बर्वे |
| मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ (छायाचित्र) | अक्षय देशपांडे (सर्व हक्क राखीव) |

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

www.tichapaan.com

tichapaan@gmail.com

Facebook Page

७३७८४९९९७७

टीप:

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ४ |
| २. | दोन शब्द | ५ |
| ३. | माय मराठी | ७ |
| ४. | सांजभेट | ८ |
| ५. | अपूर्णत्वातली पूर्णता | १० |
| ६. | माझी होशील ना? | १२ |
| ७. | सोन्याचा कप्पा | १४ |
| ८. | प्रवाही | १५ |
| ९. | भाऊ काका | १६ |
| १०. | स्त्रीचा प्रवास | २० |
| ११. | गोंधळ | २२ |
| १२. | गवसली का? | २३ |
| १३. | आदिशक्तीची नऊ रूपे | २४ |
| १४. | रीत जगाची | ३० |
| १५. | तशी तू लकी आहेस... | ३२ |
| १६. | “नाते” तुझे नी माझे | ३४ |
| १७. | वसंताची चाहूल... | ३८ |
| १८. | मायग्रेटिंग बर्ड... | ३९ |

# प्रस्तावना

- सायली अक्षय देशपांडे

रसिकहो, नमस्कार...! नवीन  विषय आणि नवीन संकल्पनांनी सजलेला तिच्या पानाचा प्रवास आज दिवसेंदिवस बहरतो आहे हे दृश्य अत्यंत सुखावह तर आहेच पण त्याहीबरोबर ते समाधान देणारे जास्त आहे. प्रत्येक स्त्री मध्ये सर्जनशीलता असते. गरज असते ती तिला व्यक्त होण्याची. आणि तिला तिच्या विचारांच्या माध्यमातून म्हणा किंवा लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचं काम सातत्याने हा अंक करतो आहे.

या अंकानी खूप सुंदर असे नवनिर्मिती करणारे कार्यक्षम हात दिले, मैत्रिणी दिल्या आणि एक सुंदर नात्यांची वीण यातून विणल्या जाते आहे. प्रत्येक लेखिकेचं लिखाण भिन्न तर आहेच पण त्यातून निरनिराळे विचार प्रतिबिंबित होताना दिसतात. हा अंक फक्त देशापुरता मर्यादित न राहता साता समुद्रापार सुद्धा तिचा प्रवास हा अविरतपणे सुरु आहे हे अत्यंत अभिमानास्पद आहे.

ज्याप्रमाणे सासरी गेलेल्या मुलीला कायम माहेरची ओढ असते तशीच आमच्या या परिवारात असणाऱ्या परदेशातल्या लेखिकांना या अंकात लिहिण्याची ओढ दर महिन्यात असते असं मला कायम वाटतं.त्यांची ही ओढ आणि यात असणाऱ्या प्रत्येकीचा सहभाग असाच कायम रहावा अशी मनापासून इच्छा इथे व्यक्त करते.

या अंकाबद्दल थोडक्यात सांगायचं झाल्यास, हा अंक तिच्या विचारांच्या वेगवेगळ्या पैलूंना स्पर्श करून इथे प्रतिबिंबित झाला आहे. या अंकाला काही ठराविक असा विषय नसल्याने हा अंक अगदी मुक्तस्वरूपाचा आहे अगदी तिच्या सारखाच मुग्ध आणि मुक्त..!या अंकात दोन शब्द लिहणाऱ्या श्री. विनय जोशी यांचे मनःपूर्वक आभार मानते. खगोलशास्त्र आणि नवरात्र यांचा उत्तम मेळ बांधत अशा अत्यंत कुतूहलाच्या विषयाला त्यांनी त्यांच्या वेगळ्या अशा लेखन शैलीने इथे लिहिलंय.

या संपूर्ण अंकाला सर्वांगसुंदर करणाऱ्या श्री. अक्षय देशपांडे यांचे सुद्धा आभार मानते आणि माझ्या लेखणीला विराम देते.

# दोन शब्द

- श्री. विनय जोशी

## नवरात्रीचा सृजनसोहळा

निसर्ग, मानवी मन आणि संस्कृती यांचं एक अनोखे  समीकरण आहे.निसर्गातील बदल मनाला उल्हसित करतात आणि हाच आनंदसोहळा सण-उत्सवाच्या रूपाने साजरा केला जातो. .अश्विन प्रतिपदाने पासून सुरु होणारे शारदीय नवरात्र देखील निसर्गाशी निगडीत आहे.आदिमाया शक्ती हिचे एक नाव 'प्रकृती' म्हणजे निसर्गच आहे वर्षभरात चार ऋतूंत, पौष, चैत्र, आषाढ, आश्विन या चार महिन्यात या आदिशक्तीची उपासना केली जाते पृथ्वीच्या सूर्याभोवती होणाऱ्या परिभ्रमणामुळे ऋतूंची निर्मिती होते.भारताच्या भौगोलिक स्थानामुळे आपल्याला वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर हे सहा ऋतू अनुभवयला येतात. सूर्याच्या आकशातील भ्रमणाचा आणि या ऋतूंचा एक सहसबंध आहे. सूर्याचा आकाशातील भासमान मार्ग म्हणजे आयनिक वृत्त. या भ्रमणमार्गातील चार प्रमुख बिंदुंच्या आसपास देवीचे चार नवरात्र होतात.

२२ डिसेंबरला सूर्य आयनिकवृत्तावरील अवष्टंभ बिंदूवर असतो. यादिवशी सगळ्यात मोठी रात्र असून सूर्याचे उत्तरायण सुरु होते.याच सुमारास पानगळीचा शिशिर ऋतू सुरु होतो. निसर्गातील हा बदल पौष महिन्यातील शाकंभरी नवरात्राच्या रूपाने साजरा केला जातो. २१ मार्चला सूर्य वसंतसंपात बिंदूवर असताना दिनमान रात्रीमान समान असतात. या काळात शिशिर ऋतू संपून आल्हाददायक वसंत ऋतूला सुरवात होते. निसर्गाचे बहरलेले रूप अगदी चटकन नजरेत भरते.त्याचा उत्सव म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून होणारे देवीचे वासंतिक नवरात्र. यानंतर दिवस मोठे होत २१ जूनला सूर्य विष्टंभ बिंदू वर असतो. या दिवशी सगळ्यात मोठा दिवस असतो. याकाळात प्रखर ग्रीष्म ऋतू संपून वर्षाऋतूला सुरवात झाली असते. हिरव्यागार निसर्गाचे हे परिवर्तन आषाढात गुप्तनवरात्रीच्या रूपाने साजरे केले जाते.यानंतर दक्षिणेकडे सरकत २२ सप्टेंबरला सूर्य शरदसंपात बिंदूवर असतो. या दिवशी पुन्हा दिवस-रात्र समान कालावंधीचे असतात. या काळात पावसाळा संपत आकाश निरभ्र होऊ लागले असते.या आल्हाददायक शरद ऋतूत अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून देवीचे शारदीय नवरात्र

नवरात्र सुरु होते.या चार नवरात्रांपैकी अश्विन नवरात्र अधिक प्रचलात आहे.

या  शारदीय नवरात्रीतील कुलाचार हे कृषीसंस्कृतीशी नाते सांगणारे आहेत. जमिनीतून धान्य,कंदमूळ उगवतात हे मानवाच्या लक्षात आलं आणि त्या आदिम काळापासून भूमीपूजनाचे विधी प्रचलात आले. श्रीसूक्तात "गन्धद्वारां दुराधर्षां" असे म्हणत या पृथ्वीलाच आदिशक्ती म्हटले गेले आहे. घटस्थापना म्हणजे  हे कृषीव्यवस्थेचे जणू  लहान प्रारूप होय. वेळूच्या परडीत सात ठिकाणची माती आणली जाते. कदाचित वेगवेगळ्या मातींच्या मिश्रणातून जमिनीची सुफलन क्षमता वाढते असा विचार असावा. यावर मातीचा घट ठेऊन सभोवती सात धान्ये पेरली जातात. मिश्र पिकांचे असे साहचर्य उत्पादन आणि गुणवत्ता वाढवते. हळदीचे पाणी शिंपडणे हे जणू कीटकनाशक फवारणीचे प्रतिक. अशा प्रकारे ९ दिवसात धान्य बहरून आले कि या समृद्धीचा उत्सव म्हणजे दसरा.

भूमीची सृजनशीलता आणि स्त्रियांची सुफलनक्षमता यातील साम्य लक्षात आल्यावर मातृदेवतांची उपासना सुरु झाली. सिंधूसंस्कृतीत अशा मातृदेवतांच्या मृण्मुर्ती आढळतात. वैदिक काळात सरस्वती, श्री, अदिती, उषा, पृथ्वी या स्त्रीदेवतांची स्तुती केली गेली. दुर्गा, लक्ष्मी, काली अशा अनेक देवतांच्या गाथा पुराणांनी गायल्या. पुरुषी अहंकारातून उन्मत्त झालेल्या महिषासुराचा या शक्तीने महिषासुरमर्दिनी होऊन वध केला. नवरात्रात या स्त्रीत्वाचा सन्मान केला जातो. सृजनाच्या जाणिवेपासून अबोध कुमारिकांचे पूजन केले जाते. सर्जनक्षम सवाष्णींची ओटी भरली जाते. पाककलेची अन्नपूर्णा, समृद्धीची लक्ष्मी, विद्येची सरस्वती, शक्तीची काली, सौंदर्याची गौरी अशा स्त्रीत्वाच्या विविध पैलूंच्या रुपात आदिमायेची उपासना केली जाते.

नवरात्री हा स्त्रीत्वाचा उत्सव असल्याने फक्त नवरात्रातच नाही तर वर्षभर स्त्रीयांचा सन्मान व्हायला हवा. हा सृजनाचा सोहळा असल्याने आपल्यातील कला, गुणविशेष यांच्यात नवीन सर्जनशीलता आणण्याच्या प्रयत्न करत आपल्याच ‘कंफर्ट झोन’ मधून सीमोल्लंघन व्हायला हवे. देशातील बुद्धीजीवी, कष्टकरी, व्यापारी, सैनिक, कलाकार अशा सर्व समाजगटात ही आदिशक्ती बुद्धी, शक्ती, लक्ष्मी, कला अशा  विविध रुपात विराजमान आहे. नवरात्रीच्या निमित्ताने तिला साद घालत समर्थ राष्ट्र निर्माणाची प्रेरणा या नवरात्रीतून आपल्या सगळ्यांना मिळो हीच आदिमायेकडे प्रार्थना!

# माय मराठी

- मैथिली अंजनकर

ज्ञानरुपिणि मायमराठी
तुजला विनम्र वंदन
तिमिरातून ज्ञानाचे
फ़ुलवी दिव्य स्पंदन||

मुकुंदराजांनी माये
वैभवी तुजशी नेले
ज्ञानेशांच्या ओवींमध्ये
चिंतन भावुक ओले ||

आर्त सुंदर  संतांची
मधुरम् झाली वाणी
समर्थ – एकनाथांच्या
मुखी फ़ुलविली गाणी ||

हरि नारायण अन्
श्री फ़डके खांडेकर
तुझी लेक बहिणाई
नि मालती बेडेकर ||

ज्ञानतपस्विनी शोभे
मूर्त भागवत दुर्गा
पद्मा , शांता नि इंदिरा
ने कवितेच्या त्या स्वर्गा ||

प्र. के अत्रे आणि चिं वि
तसेच अमुचे पुलं
तव वेलीवरची आहे
अमुची लाडकी फ़ुलं ||

तुझ्यामुळे आकाशाला
हा अर्थ लाभला आई
महाराष्ट्राची ठरली
तू मूर्तिमंतची आई ... ||

तुझ्या पाऊली पसरे
मी प्रेम पारिजातक
माये झाले माझे सारे
तव स्पर्शाने सार्थक ..||

तुझ्या पाऊली तुझ्याच
शब्दाचा हा शिंपी सडा
गुणगातांना तुझिये
भिजल्या पापणकडा .  ||

# सांजभेट

- वर्षा पतके थोटे

ही सांज फार व्याकुळ करून सोडते. सूर्य मावळाया लागला की मग फुलेही मावळाया लागतात. फुल कोणातरी एकाचं असतं. ही पानांची कुजबुज ऐकू आली आणि मी भानावर आले. कित्येक जन्मातले हळवे रंग सांभाळून मी तुझ्यावर उधळायचे हे मनोमन ठरवत आले म्हणून माझी मीच आनंद रंग मिरवत आले. पण सांजेला अचानक वारा शीळ घालत आला. का कुणास ठाऊक पण कुणाचे तरी विखुरलेले मन रंगात मिसळून गेला. सांजेचा जीव व्याकुळ झाला. गती संथ झाली. मी नि:स्तब्धपणे त्या शांत समईकडे पाहाते आहे. पक्ष्यांची किलबिल मंदावली आहे. सांजेचा श्वासही दुर दुर वलयात गुंडाळतोय असा तो भास , सांजेने फुलाला विचारायच्या आधीच फुलाच्या पाकळ्या गळायला लागल्यात. पाव्याचे स्वर आसमंती विरायला लागलेत. साधे प्रश्नही कठीण वाटायला लागलेत. मन सैरभैर धावायला लागले. मन धावता धावता दुर तुझ्यापर्यंत पोहचतं झालं आणि मला दुरवरून माझ्या आवडीच्या गाण्याचे स्वर ऐकू आले आणि मन आपसुकचं आनंदी होऊन आठवणीत पोहचलं सुद्धा. ते गाणं कोणतं होतं माहिती आहे तुला ? नाही ना ? ऐक तर मग.....

“ बगळ्यांची माळफुले अजूनही अंबरात

भेट अपूली स्मरशी काय तू मनात ? ”

बघ ना मला अजूनही आठवते ती आपली भेट . काय बोललो होतो त्या भेटीत देवचं जाणो ? पण भेट मात्र कायम आठवते. कधी क्षणभ-याचा विसर पडलाही तरी ही झाडं , वेली आणि त्यांची ती चित्तचोरटी पानं कायमचं कुजबुजत असतात आणि सोबतीला तो खट्याळ वारा . त्यांच्या गप्पात आपल्या भेटीचा विषय हमखास असतोच असतो. मग ही दुष्ट विसरायचं म्हटलं तरी विसरू देत नाहीत बघ ! पण  तुला आठवते का ती आपली भेट ? ती ओल्या माळरानात झालेली. अगदी सांजेलाच तर भेटलो होतो आपण. पण फार परके होतो एकमेकांसाठी. उसणं अवसान  आणून बोलत राहीलो एकमेकांशी आणि लगेच वेळही संपली आपली भेटीची. ना पुन्हा भेटायचा आग्रह ! ना कसला खटाटोप ! बस एक रित्येपण संपून एक मोठा श्वास अंतरी साठवून निघालो आपाआपल्या रस्त्याने. फक्त एक विश्वास पदरात बांधून घेतला होता मी त्या भेटीतून, मग त्या मी बांधून आणलेल्या विश्वासानेच उत्तर दिलं बघ त्या पानांच्या कुजबुजीला की हो धुकं दाटलं नाहीए तर धुकं हलकं हलकं

होत चाललंय त्यातून एक प्रसन्न पहाट दिसेल या विचारानेच मन सुगंधी झालंय आणि सांजभेटीच्या संधिप्रकाशात केव्हाचं उजळून निघालंय आणि मग मन आतून शांत शांत होत गेलं. दुर माळरानावरचं ते गाणं मात्र अखंड सुरू होतं आणि मी आनंदाने थुई थुई नाचायला लागले. अगदी मोर पिसारा फुलवून नाचतो तसे. पण मी मात्र साडीचा पदर डोईवर घेऊन नाचत सुटले आणि गुणगुणतही होते.

"भेट अपूली स्मरशी काय मनात?"

ही आपली भेट कायम स्मरणात राहावी म्हणून तिला चिरंजीव होण्याचा आशीर्वाद लाभावा एवढाच काय तो मनी अट्टहास बाळगून आहे बघ ! आणि हा आशीर्वाद तू देशील हा विश्वास आहेच . उगाच का मी परमेश्वराएवढचं तुला मनात जपलंय सावळसख्या...

# अपूर्णत्वातली पूर्णता

- मृण्मयी सारंग

अपूर्णम्हणजे जे पूर्णनाही , ज्याला पूर्णत्व प्राप्त नाही. पण काय गंमत आहे बघा अपूर्ण शब्दात सुद्धा पूर्णता दडलेली आहे. आपण मात्र त्या *अ* कडेचं आपलं लक्ष देत असतो. जो शब्द स्वत:मध्ये पूर्ण आहे तो इतर गोष्टींना अपूर्ण कसा बरं ठरवू शकतो.प्रत्येक गोष्टी, व्यक्ती आपापल्यात पूर्ण असते. आपणचं त्याला आपल्या विचारांनी, दृष्टीनी पूर्ण आणि अपूर्ण यात विभागत असतो. तो निसर्ग जगातील सर्वोकृष्ट चित्रकार प्रत्येक चित्र पूर्ण करूनचंह्या भुतलावर पाठवतं असतो. आपण त्यात रंग भरत असतो. पण रंग भरतांना आपण हा विचार करतो की आपण अपूर्णगोष्ट पूर्णकरतोय .मात्र असतं वेगळचं आपण पूर्णअसलेल्या गोष्टीलाचं परत नव्याने पूर्णत्व प्राप्त करून देत असतो.

संस्कृतात आपण एक श्लोक म्हणतो ," ओम पूर्णमद: पूर्णमिदं......" ह्याचा अर्थ असा की देव नेहमीच सर्व प्रकारे परिपूर्ण असतो. हे जग देखील त्या ब्रह्मणाने परिपूर्ण आहे कारण हे संपूर्ण जग त्याच्या पासून निर्माण झाले आहे. त्या संपूर्णमधून पूर्ण काढल्यानंतर देखील ते पूर्णच राहिले.

परिपूर्ण म्हणजे .

0 + 0 = 0, 0-0 = 0, 0x0 = 0.

पूर्णतून काहीही काढलं तरी ते पूर्णचं राहतं. पूर्णतून उत्पन्न होणारी गोष्टही पूर्णचं असते.

आपण एक शब्द वापरतो " बाळंतपण". बाळंतपण म्हणजे बाळाची आस असलेल्या स्त्रीपणाचा अंत होऊन तिला मिळणार मातृत्वाचं दान. एक स्त्री आपल्या रक्तातील पोषणाने , मनात निर्माण होणाऱ्या प्रेमाने मायेने ९ महिने एका अंकुराला अंकुरीत करत असते. त्याला फुलवतं असते.

योग्य वेळ आल्यावर ती त्या फुल्लीत अंकुराला ह्या जगात आणते. स्वत:तील अनेक घटकांनी त्या गर्भाला पोषीत करूनही ती स्त्री अपूर्णहोत नाही. उलट ती स्वत:च्या पूर्णत्वला नविन कंगोरा तर देतेचं पण एक नविन पूर्णत्वलाही जन्म देते.

गरजेचं नसत कायम पूर्णविराम लागेलच हवा म्हणून कारण कधी कधी स्वल्पविरामा नन्तरच वाक्य जास्त सुंदर असतं.अनेक लोक आपल्या आयुष्यातील अपूर्णता स्विकारून आनंदाने जगत असतात. पावलोपावली होणाऱ्या अपेक्षाभंगातून समाधानाचे चार क्षण मिळवत असतात.

**कोणतीही गोष्ट संपवायला एक क्षणही पुरेसा आहे. त्यासाठी हिंमत लागत नाही. ती लागते टिकवायला, सांभाळायला, जपायला आणि वाढवायला. ती हिंमत जगण्याचे बोट सोडणाऱ्याकडे कधीच नसते. ती असते मदत मागणाऱ्याकडे आणि देणाऱ्याकडेही.**

# माझी होशील ना?

- प्राजक्ता बर्वे

रात्र होती शांत आणि अंधार होता दाटला

त्या तश्या रात्री मला तो अकस्मातंच भेटला

डोळ्यांसमोरी येऊन गेल्या सुख-दुःखाच्या आठवणी

पण प्रेम बाकी जाणवले नाही मजला भेटीच्या क्षणी

हसलो आम्ही, बोललो ही, पार वेडी ती मजा

शिवला मनास विचार तेव्हा या परी न कोण दुजा

कायमच कसं डळमळीत वागतं वेड मन माझं

नको नको म्हणतानाही होत जातं बघ तुझं

शेवटी ओरडलेच मी त्याला म्हंटलं हिंडु नको जरा

डोळे मीट तेव्हा कळेल तुझा विचार खरा

तितक्यात समोरून प्रश्न आला, काय नातं आहे आपलं?

जपायचं नव्हतो म्हणत मी, कोण जाणे का जपलं?

जो विचार मी करतोय तोच तुझा चाललाय ना?

नात्याला या नाव वेगळे द्यायची वेळ आलीये ना?

स्तब्ध झाले मी तिथेच, डोळे कान तपासले!

बोलणार होते खरं तर पण जराशी अवघडले...

तू जे बोलतोयस ते खरंय का उग्गाच आपलं फ्लरटिंग ब्लिरटिंग

कारण काय आय एम क्लिअर, आय एम नॉट मेड फॉर डेटिंग

त्यात इतके वर्ष तू कधीच काहीच बोलला नाहीस..

आता इकडे आलायस कारण देअर ईज नो चॉईस?

भीती वाटते रे मला सगळं ईमॅजिन करतांना

नाही पाहू शकत आता तुला निघून जातांना..

खऱ्या आयुष्यात असं काही बघायला मिळत नाही..

तू जे बोलतोयस ते कळतंय पण वळत नाही..

तुझ्या मनातलं ओळखायला मी जरा उशीरच केला

**शॉर्ट वाला प्रवास उगाच इतक्या दूरवर नेला...**

**चुकतो तोच खरा माणूस, हे तुला मान्य आहे ना?**

**आज विचारतो धीर करून, सांग माझी होशील ना?...**

# सोन्याचा कप्पा

- स्नेहा जोशी

नवरात्राची घरभर आवराआवर होते..आवरताना बरंच काही हातावेगळं होऊ लागत..टाकुन द्यायच्या, जपुन ठेवलेल्या, गरजेच्या,अशा अनेक गोष्टी बाजुला होतात..गबाळ अडगळीचा तो माळा कसा स्वच्छ होतो..

माणसाच्या मनाचं ही काहीसं असचं असावं..रोजच्या व्यवहारी जिवनापासुन हातभर लांब राहणारा माणुस, एकांतात मात्र स्वतःशी खुप प्रामाणिक असतो..मग तेव्हा मात्र खुप काही सापडतं..मान, अपमान, मैत्री, प्रेम, फसवणुक, व्यवहार, जिव्हाळा, आयुष्य जगतानाचे अनुभवआणि बरंच काही अलगद उफाळुन येतं.. मनाच्या शांत समुद्रात अनेक वादळे विसावलेली असतात..आठवणींच्या पत्थरफेकीनं सारं ढवळुन निघतं.. हवा असलेला, नको असलेला, जपलेला, सांभाळलेला सारा कचरा वेगवेगळा होत राहतो..

नात्यांचही असचं..मनात जपलेली, नको असलेली, कर्तव्य म्हणुन जोडलेली, अधिकार म्हणुन गाजवलेली, व्यवहारी, मैत्रीची अशी अनेक नाती मनांत घर करुन असतात..वेळ आली की काहींचा निरोप घ्यावा लागतो, काहींना जाणुनबुजुन निरोप द्यावा लागतो, काही जपावीचं लागतात, काहींना आधार द्यावाचं लागतो.. मनात आक्रंदन चालु असतं.. पण दुस-याच्या मर्जीचाही विचार करावा लागतो..जीवापेक्षा जास्त जपलेल्या माणसांना कधी त्यांच्या मनाप्रमाने वागु द्यावं..वेळ सरला की सारं काही निवळतं..आठवणी मात्र तशाचं राहतात.. मनाचा कप्पा मोकळा होतो..अन् उरतं ते आवडत्या व्यक्ती, आठवणी, यांच सुंदर कलेक्शन.. कधीही हातावेगळं न करावसं वाटणारं.. आणि हेचं असतं आयुष्याचं सोनं..

नात्यांना कधी एक्सपायरी डेट नसते आणि नसावी..पण फक्त ज्यावेळी आठवण होईल त्यावेळी चेह-यावर हसु मात्र नक्की विलसायला हवं..आपण हे नातं मनातं जपुन ठेवलं याचं समाधान.. भले ही ती व्यक्ती सोबत नसु देत,तिच्या आठवणी सदैव मनाच्या कप्प्यात विसाव्यात.. कारण निवळुन, वगळुन जे काही हाती लागतं ना, त्याची सर बावनकशी सोन्यालाही नसते.. अशा नात्यांनी आयुष्याला परिपूर्णता लाभते, अन् झळाळी येते सुवर्णाची..असं सोनं प्रत्येकाला लुटता यावं!!

# प्रवाही

- दिप्ती शिंदे दळवी

एखादी गोष्ट मनाविरुद्ध घडली की सुरू होते आपली धावपळ

ह्यापेक्षा अधिक चांगलं काय घडू शकलं असतं, अधिक चांगलं काय करता आलं असतं, याची यादी बनवण्याची...

ठीक असतं, जर गोष्ट इथवरच थांबली असती

पण गुंता तेव्हा वाढतो जेव्हा आपण ह्या 'जर तर'च्या चक्रव्युहात अडकून बसतो...

कारण ह्या चक्रव्युहातच पेरलं जातं बियाणं परद्वेषाचं आणि आत्मद्वेषाचही

परद्वेष काय नि आत्मद्वेष काय, दोन्ही उध्वस्त करतात बहिर्गत आणि अंतर्गत शांती, स्थैर्य

आणि आपण गमावून बसतो आंतरिक शक्ती एक सुंदर भविष्य घडवण्याची...

बोल लावून इतरांना आपण झटकून देतो जबाबदारी स्वतः स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार होण्याची

आणि हळूहळू कमी होतो विश्वास स्वतःच्याच हातांवरचा व बुद्धीवरचाही...

अशानेच कमी होतात प्रयत्न स्वतःकडून मग पुढील प्रत्येक कामात

आणि मग पुन्हा काहीतरी घडतं मनाविरुद्ध आणि सुरू होतं तेच दुष्टचक्र...

कसं भेदावं या चक्राला?

अवलोकन करावं परिस्थितीच, स्वतःच्या कृतीच, काही मनाविरुद्ध घडल्यावर आणि तिथेच थांबावं

जरूर विचार करावा काय अधिक चांगलं करता आलं असतं, काय अधिक चांगलं घडलं असतं याचा...

पण गिरवत बसू नये तीच 'जर तर'ची यादी

नाहीतर शक्यता असते ती यादी गिरवता गिरवता आधीचं किंवा नंतरच अजून एखादं सुंदर पान कुरूप होण्याची...

त्यापेक्षा झालं गेलं सर्व स्वीकारून व्हावं मोकळं आणि निश्चिंत

गरजेचे धडे जरूर घ्यावेत पण अडकून पडू नये तिथेच...

डबकं करून घेऊ नये आयुष्याचं, प्रवाही करावं स्वच्छ करावं त्याला नदीसारख

आणि ध्यास धरून मार्गक्रमण करत रहावं, विशाल सागराकडे, आपल्या अंतिम ध्येयाकडे...

# “भाऊ काका”

- डॉ. सोनाली गायकवाड

आयुष्य हा जर एक प्रवास असेल, तर ह्या प्रवासात वेगवेगळ्या टप्प्यांवर आपल्याला वेगवेगळ्या प्रवाशांची सोबत मिळतं असते. तो प्रत्येक प्रवासी आपल्याला काही देऊन जातो, कदाचित काही घेऊनही जातो. प्रवासाच्या सुरवातीला भेटणारे प्रवासी आपलं व्यतिमत्व घडवत असतात.नंतरचे बरेचदा शिकवत असतात, काही धडे घालून देत असतात . कधी चांगले, तर कधी वाईट वागून.

प्रवासात अशी एक एक व्यक्ती भेटत जाते आणि नकळत आपल्या मनात ती व्यक्ती, तिचं व्यक्तिमत्व घर करून बसतात , ते कायमच. त्यांचा अनोखा आणि स्वतंत्र दरवळ आपल्या आयुष्याच्या वेगेवेगळ्या कुपीत घालून आपण पुढे जात असतो. नकळत आपली गंधाली समृद्ध होत असते. त्यात महत्वाचा वाटा आहे, तो आम्ही लहानपणी ज्या वाड्यात राहिलो त्या वाड्याचा. त्यातील लोकांचा. प्रत्येक व्यक्ती आपल्या परीने वेगळी आणि समृद्ध.

आयुष्याची गंधाली ज्यांनी समृद्ध केली असं म्हणता येईल त्यातील काही कुप्या उघडून तो दरवळ पुन्हा अनुभवायचा प्रयत्न केला तेव्हा आठवतं   सुगंधी व्यक्तिमत्व.

भाऊ काका

आमच्या वाड्याच्या घरमालकांच्या तीन मुलांपैकी मधले. म्हणजे मधले घरमालक, 'भाऊ काका'

हे एक अजब रसायन. कमालीचं मिश्किल आणि अनाकलनीय.

गणपतीचे दिवस आले, की दरवर्षी ह्यांची आठवण होते. हे नसते तर लहानपण इतक सुंदर झालंच नसतं. ह्यांना तशी दोन अपत्य, पण साऱ्या वाड्याची मुलं ह्यांचीच होती. गणपतीच्या दिवसात सार्वजनिक गणपती दाखवायला हे अख्या वाड्यातील सगळी मुलं, मुली घेऊन जायचे. चितार ओळीतील गणपती पासून सुरु होणारा हा प्रवास गांधीबाग, इतवारी, फवारा चौक हे सारे गणपती पाहून व्हायाचा. दुसरे दिवशी मग, मॉडेल मिलचा गणपती. एक दिवस कॉटन मार्केटचा. हे सगळे गणपती पाहायला आम्ही सात आठ मुलं मुली आणि ते एकटे मोठे, आणि हा सगळा प्रवास पायी. कुठे ही गाडी नाही की रिक्षा नाही. मग शेवटच्या दिवशी सगळ्यांना घेऊन ह्यांचा मोर्चा गांधीबाग बगिच्यात दुर्वा तोडायला. सोबत कच्चा चिवडा फक्त. पाणी सुद्धा आम्ही तिथल्या नळाचं प्यायचो,

हाताची ओंजळ करून. पण तेव्हा कधी काही झालं नाही. ना इन्फेकशन ना ऍलर्जी. एरवी पण आम्ही कधी तळ्याच्या बेटावर, तर कधी टाऊनहॉल च्या बागेत जायचो ते ही ह्यांच्याच सोबत. कधी एक एक रुपया आणायला सांगायचे आणि त्याचा उसाचा रस प्यायला न्यायचे. आमच्या पैकी कुणाच्याही आई वडीलानी आम्हाला बागेत, तळ्यावर, किंवा गणपती, महालक्ष्मी पाहायला नेल्याचं आठवत नाही. आम्हा लहानमुलांमध्ये ते लहान होऊन राहायचे.

ते आजन्म खेळकर आणि खोडकर राहिले. जीवन हा एक हास्यपट होता त्यांच्यासाठी.

वाड्यातल्या प्रत्येकाची खोड काढल्या शिवाय ह्यांना राहताच येत नव्हतं.

ह्यांचे किस्से अविस्मरणीय आणि आजही खळखळून हसायला लावणारे.

एकदा आमच्या मागच्या दाराने ते आत आले आणि अगदी दारातच असलेल्या स्टूलवर बसले. हे असे अचानक का आले, आणि तिथे दारातच का बसले ह्या विचारात आम्ही असतानाच ते म्हणाले गर्मी खूप आहे पंखा वगैरे  का नाही लावत? असं म्हंटल्यावर पंखा लावावा म्हणून मी उठली तर लक्षात आलं, पंखा ज्या स्टूलवर ठेवला असतो (तेव्हा टेबल फॅन असायचे) तिथे तर हे बसले आहेत.

मग पंखा गेला कुठे? मला प्रश्न पडला.

पण आई मात्र हसू लागली.

पंखा बहुदा चोरी गेला आणि ही का हसतेय मला कळेना?

तर ती म्हणाली, " काही नाही ह्यांनीच पंखा लपवून ठेवला असेल.

मला विश्वास बसेना. ते ही नकार दयाला लागले. पण आईला ह्या साऱ्याची सवय होती, आणि खरंच तिचं म्हणणं बरोबर होत. पंखा दुसऱ्या खोलीत आतल्या दारापाशी. म्हणजे ह्यांनीच तो तिथे उचलून नेला आणि आमच्या लक्षात आलं नाही म्हणून पुन्हा आम्हाला लक्षात आणून दयायला गर्मीच नाटक केलं. हे नेहमीचं होतं.

कधी कुणाचे विहिरीवरचे कपडे लपवायचे

तर कधी बाहेर जाणाऱ्यांच्या चपला.

कधी सायकल घेऊन नागपूची सैर करायचे. सकाळी गेले की रात्रीच यायचे आणि सांगायचे नागपूरला चक्कर मारून आलो.

एक लाल पांढऱ्या रेषांचा पंचा सतत गळ्यात असायचा.

कायम सायकलने फिरणाऱ्या ह्या स्वारीने गाडी घ्यायचे ठरविले. कोणती घेणार, विचारलं तर म्हणाले सगळ्यात महाग जी असेल आणि गावाला मातीत जी चालेल ती. मग राजदूत घ्यायची ठरवलं. ती विकत घ्यायला असेच गळ्यात पंचा वगैरे घालून गेले. भाजी आणायला जातो तसली पिशवी हातात घेऊन सायकलने. एकाला सोबत घेऊन. ह्यांचा तो वेष पाहून,

तिथल्या शोरूम वाल्यानी विचारलं, "काय हवंय ? "

तर म्हणाले, ""राजदूत ".

त्याने विचारलं, "कधी घ्यायचीय ? "

हे म्हणाले, "आत्ता "

तर तो म्हणाला, "कशी घेणार? "

हे: "पैसे देऊनच घ्यावी लागेल नं? की फुकट पण देता? "

तो :"नाही हो, म्हणजे लोन घ्यायचंय की कॅश? "

हे :"पिशवी आणली आहे न"

तो :"पिशवी? "

हे : "हो मग? "

तो :"पिशवीत कशी नेणार "

हे :"काय मूर्ख समजता का? पिशवीत कशी नेणार? पिशवीत आणले आहे."

तो: "काय? "

तर ह्यांनी टेबलवर पिशवी उलटी करून सांगितलं "कॅश "

तो माणूस ही अवाकच झाला की राव.

असे ह्यांचे किस्से!!

एकदा हे, एकदा अंघोळ करून आले आणि ह्यांना घरी कुणी तरी सांगितलं कोथिंबीर विकत आणायचा आहे.

हे तडक होते तसे कच्छा( रेषांची डगली नाडा असलेली कापडाची अंडर पॅन्ट) घालून बाजारात. रस्त्यात येताना ह्यांच्या दोन वहिनी दिसल्या. त्या दोघी ह्यांना पाहून ओशाळल्या आणि न पहिल्या सारखं केलं, तर हे आवाज देऊन त्यांना हात दाखवीत होते. रस्त्यावरची सगळी माणसं एकदा ह्या दोन बायांना आणि एकदा त्यांना पाहत जागच्या जागीच उभे.

असे ह्यांचे किस्से सांगावे तेवढे कमी.

एकदा, एकाला दोन हातांचे पंजे थोड्या अंतरावर ठेवून उभे राहायला सांगितलं आणि स्वतः पाण्याचा पेला त्या दोन पंजांच्या फटीतून जातो का म्हणून प्रयत्न करीत होते. विचारलं तर म्हणाले ट्रेननी मुंबईला सासरी जायचाय म्हणून प्रॅक्टिस करतोय, ट्रेनच्या खिडकीतून ग्लास जातो की नाही?

अशी ही जगावेगळी मिष्कील तऱ्हा. कधी कधी त्यांच्या ह्या विचित्र वागण्याचा त्रासही व्हायचा घरातल्यांना, पण आम्हा मुलांचे ते लाडके होते.

दरवर्षी गणपती विसर्जनाला जाताना त्यांची आठवण येते.

गेली दहा वर्ष झालीत ते आमच्यात नाहीत. पण कायम असे आठवणीत असतात. त्यांच्या आठवणींची कुपी उघडली की अजूनही बालपणाचा खट्याळ, मिष्कील सुवास दरवळतो. काल परवा घडल्या सारख्या साऱ्या गोष्टी नजरे समोरून जातात आणि हसरा दरवळ मागे सोडून जातात.

एक आनंद मनाला देऊन जातात.

# स्त्रीचा प्रवास

- पल्लवी पळसकर

तुलसी यस्य भवने प्रत्यहं परिपूज्यते।

तद्गृहं नोपसर्पन्ति कदाचित् यमकिंकराः।।

या स्कंदपुराणातील श्लोकाचा अर्थ असा आहे की, ज्या घरात नियमित तुळशीचे पूजन केले जाते, त्या कुटुंबातील सदस्य कमी आजारी पडतात.

श्रीकृष्ण तुळस, लक्ष्मी तुळस, श्वेत तुळस, राम तुळस, नील तुळस या तुळशीच्या नावांवरून यांचे वेगळेपण लक्षात येते. तुळशीच्या या प्रत्येक प्रकाराचे गुणधर्म अगदी वेगवेगळे आणि विशेष आहेत. तसेच आपली खापर पणजी, पणजी, आजी, आई यासुद्धा वेगवेगळ्या पिढीतील आहेत. यांचे स्वभाव वेगळे, विचार वेगळे. तुळशीला मांगल्याचे प्रतीक मानले जाते. तसेच घरातील स्त्रीलासुद्धा मांगल्याचे प्रतीक म्हणतात. एक स्त्री ही घरचा पाया असते. कर्ता पुरुष वडील असला तरी तिच्या जीवावरच पूर्ण घर चालत असते आणि तिच्या जीवावरच पुढची पिढी घडणार असते. किंबहुना त्यासाठी तिलाच सर्वस्वी जबाबदार धरले जाते.

पंचविशीतील एखाद्या तरुणीने आपल्या तिशीच्या दशकातील आजीचा इतिहास जाणून घ्यायचा प्रयत्न केला तर तिला हे लक्षात येईल (अपवाद वगळता). त्या वेळेस आपल्या आजीला स्वतःचे असे कोणतेच विचार नव्हते किंवा तिच्याजवळ तो द्रष्टेपणा नव्हता. अगदीच रांधा वाडा उष्टी काढा यापलीकडे कोणतेच जग नाही. कारण तेच संस्कार तिच्या आईने तिच्यावर केले होते. केवळ चूल आणि मूल हेच तुझं जग. त्यामुळे पलीकडे जायची तिने कधी हिंमत केलीच नाही आणि त्यामुळे ती अशिक्षित आणि अज्ञानाच्या वेटोळ्यात गुरफटत गेली. परिणामी आई व मुलं यांच्यात समन्वय ठेवणे कठीण झाले. आणि असेच पिढी दरपिढी चालत आलेले संस्कार, मूल्य पुढच्या पिढीत रुजत गेली. अनेकदा मुली आपले मन मोकळं करू शकत नाहीत. त्यांना येणाऱ्या समस्या सांगू शकत नाहीत. कसं बोलू, कसं सांगू यात गुंतून जातात. कारण प्रश्न विचारायचे नाहीत, जे आहे ते तसंच स्वीकारायचं. आम्ही पण तेच केलं, अशी वाक्ये कानी पडतात. कमी बोल, जास्त हसू नको, इथे जाऊ नको, ते करू नको, अशी बंधने लादली गेली. कोणत्याही नात्यात केवळ मैत्रीचं नातं हे कायमस्वरूपी असेल तर त्यांना व्यक्त व्हायला समान मुभा मिळते.

समान अधिकार मिळतात आणि एकमेकांचे दोष सांगण्याची समान संधीसुद्धा हेच नातं देऊ शकतं. बाकी इतर नात्यांमध्ये मान, सन्मान, कर्तृत्व मोठं असणाऱ्या व्यक्तीकडेच झुकते माप असतं. आणि ते गोड नातं एका आई आणि मुलीमध्ये असेल तर त्यांच्यातील संवादाला कोणतीच परिसीमा नसते. त्या एकमेकींना उत्तम पद्धतीने समजून घेऊ शकतात. ते भावनिक बंध काही औरच असतात.

पण याचा समतोल त्या आईला करता यायला हवा. कारण मुलांचे सामाजिक व वैचारिक दृष्टिकोन हे अगदीच तिच्यापेक्षा वेगळे आहेत. ज्याला आपण जनरेशन गॅप असं म्हणू. आणि जी आई ही दरी कमी करते ती बहुतेक इतरांपेक्षा जास्त आपल्या मुलांना समजून घेऊ शकते. सहसा आई आपल्या घराभोवतीच जग गुंफते. घर, नवरा, मुले असा जेव्हा तिचा प्रवास सुरू होतो तेव्हा तिची काही ठराविक मूल्यं असतात. मुळात ती तिच्यावर झालेल्या संस्कारांमुळे तयार होतात. पण एकदा का ती या जगाच्या कैदेत अडकली की तिची नवीन मूल्यं तयार करण्याची क्षमता खुंटली जाते. नवीन विचार कळून घेण्याची क्षमता सीमित होते.

आणि ज्या मातांची विचारांची क्षमता खुंटली गेली नाही अशा आयांबद्दल खरंच कुतूहल वाटतं. कारण त्यांनी स्वतःला जगाच्या साचेबद्ध पद्धतीत डांबून ठेवले नाही. त्यांना आजची स्त्री नेमकी काय ती कळली. ती कशी कळली, त्यासाठी त्यांनी काय केले असेल हा पण एक कुतूहलाचा विषय आहे. स्त्रियांच्या समानतेचा सतत चाललेला लढा हा तेव्हाच पूर्णत्वास जाईल जेव्हा स्त्रियांची आधीची पिढी येणाऱ्या पिढीच्या सामाजिक, वैचारिक बदलांना समजून घेईल व स्वीकारील.

# गोंधळ

- अंजली उपाध्ये

कुलस्वामिनी माय मुधाई

जीव समर्पित तुझिया ठायी

शक्ती भक्तीचा करिते जागर

वाजवूनी संबळ,घालिते आईचा गोंधळ उदो
उदो उदो ,आईचा उदो उदो उदो....

करवीरवासिनी अंबाबाई

साद घालीते तुजला आई

मातृरूपे तू स्थापित होसी

हृदयास्तव मम आपूल्या घेसी

वात्सल्यनिर वर्षू दे......

उदे ग अंबे उदे उदे.........

तुळजापूरची माय भवानी

शिवबांची तू कुलस्वामिनी

शक्ती रूपे तू स्थापित होसी

स्वरक्षणास्तव शक्ती देसी

कृपा खड्ग करी दे

उदे भवानी उदे........

माहूरगडची माता रेणुका

भावभक्तीने मारिते हाका

शांती रूपे तू स्थापित होसी

समाधानी तू मजला करिसी

संयम मनी वसु दे

उदे रेणुके उदे.............

त्रिगुणात्मक सप्तशृंगी माता

सकल मनोरथ पुरवी आता

बुद्धीरूपे तू स्थापित होसी

प्रतिभेचा मम आशिष देसी

प्रज्ञादान मज दे........

सप्तशृंगी आई उदे उदे.........

# गवसले का?

- संजीवनी मराठे

स्पर्शविना कशी जाणीव ती भावनांची

लालसा वा प्रेमाचे अंतर दाखवणार ती

ही समजूत, या मनाची, सहज शक्य आहे

प्रेम न गवसलेल्या लाच ते मान्य आहे

उगाच ते हसणे स्वतःचेच रूसवे फुगवे

वर्तमान विसरणे प्रियकरालाच शक्य आहे

वेडगळ हो समजूत तुमची ,दक्ष राहून मार्गक्रमण करण्याची

बेधुंद होऊन आयुष्य जगण्यात वेगळेच मजा आहे

प्रेयसी हवी प्रेमासाठी ,आयुष्य बहरवण्यासाठी

स्त्रीची सक्त गरज नाही हा अनुभव घेण्यासाठी

ही तर एक भावना तरल देत राहणे हा ज्याचा नित्यक्रम दुसऱ्याच्या सुखात सुख पाहणे यात वाईट काय आहे खरंच ?

होऊन जातं तेच प्रेम असतं ,सक्तीने करावं तर लग्न लागतं

लग्नानंतर प्रेम करणं, सांगा खरं कोणाला पसंत आहे

प्रेम न गवसलेल्या लाच ते मान्य आहे

अजूनही वेळ गेली नाही प्रेम अनुभवण्यासाठी

उंच शिखरे ,खोलदरी गुलाब आवडण्याची

नुस्तं जिवंत असून फायदा नव्हे तोटेच जास्त आहे, हिमालय ते हिंद समुद्र वाट तुझी पाहतो आहे

त्याच्या नित्यक्रमात ,एकदा स्वतःला हरवून जाऊ द्या प्रेमाच्या त्या धुंदीला तुमच्यात एकदा अवतरू द्या....

# आदिशक्तीची नऊ रुपे....

- डॉ. मानसी मोहरील

स्त्री..

ती लक्ष्मी आहे,सरस्वती आहे, अन्नपूर्णा आहे, दुर्गा आहे, काली आहे.. तशी तर तिची असंख्य नावं आपल्याला ठाऊक आहेतच. पण आपल्या आयुष्यातली तिची किती असंख्य रुपं आपण पाहतो, जगतो... वयाच्या प्रत्येक टप्प्यात ही देवी वेगवेगळ्या रूपात, वेगवेगळी पात्र साकारत आपल्या अवतीभवती वावरत असते.

जसा चंद्र आपल्या प्रत्येक कलेत अधिकाधिक उठून दिसतो, त्याचं तेज प्रत्येक कलेत वाढत जातं. तसंच ह्या स्त्री रुपाचं आहे. प्रत्येक कलेत ती अधिकाधिक सुंदर, तेजस्वी होत जाते...

कन्या रुपात येऊन ती आपल्या आयुष्यात रंग भरते, तिच्या बाल लिलांनी सगळ घर उजळतं. तीच्या लहान लहान डोळ्यातलं ते कुतूहल मनाला वेड लावतं. हळूहळू जशी ती मोठी होते, असंख्य अविस्मरणीय क्षण आपल्याला देते. आपल्या कर्तृत्वाने, आपल्या गोड बोलण्याने, वागण्याने सगळ्यांना आपलंसं करुन टाकते. स्वकर्तृत्वाने एका घराचं नाव उंचावून, लग्नानंतर आपल्या नविन घराचंही नाव मोठं करते. संसार करता करता अर्थाजन सुद्धा करते तर कधी एक उत्तम गृहिणी बनून आलेल्या पैश्याचं नियोजन करुन उत्तम घर चालवते. ती आई बनून आपल्या मुलांचं संगोपन करते, त्यांची मैत्रिणी बनून त्यांना योग्य मार्गदर्शन करते.

ती सहचारिणी असते, कधी मार्गदर्शक बनते तर कधी अल्लड सखी! म्हातारपणी ती आजी होऊन नातवंडांना त्यांच्या आयुष्यातल्या सगळ्यात गोड आठवणी देते तर पुन्हा संपूर्ण कुटुंबाला एक आधाराची सावली देते.. प्रत्येक भूमिका ती अगदी मनापासून पार पाडत असते आणि म्हणूनच माझ्या आजूबाजूला वावरणारी ही स्त्री इतर कुठल्याही देवी पेक्षा मला जास्त पूजनीय वाटते.

बालपणातील ती जेव्हा एखाद्या घरी मुलगी जन्माला येते, तिचं असणंच घराला एक हळवेपण देऊन जातं. तिच्या असण्याने, तिच्या हसण्याने घराला घरपण प्राप्त होतं. तिच्या बाललीलांनी, नखऱ्यांनी, नटण्या मुरडण्यानी घराचं रुप पालटतं. अश्यावेळी तिच्या आई वडिलांच्या मनात काय

येत असेल ते कवितेत मांडण्याचा मी प्रयत्न केलाय.

*नाजूकश्या ओठांवर लाली*

*इवले पाऊल पैंजण घाली*

*कुतुहलाचा पत्ता डोळे*

*केश रेशमी उडवत भाली*

*लाडाची ग बाहुली माझ्या*

*सोनपावली जीवनी आली...*

आता ही चिमुकली मोठी होतेय. असंख्य नव्या गोष्टींना समोर जातेय. तिचं शिक्षण, तिच्या कलांना एक आकार मिळतोय. तिचं भावविश्व विस्तारतंय.. तिच्या समोर अनेक बदल हात पसरून उभे आहेत अन् त्यात एक बदल आहे ऋतुप्राप्तीचा. सुरवात जरा अवघड असते, हे माझ्यासोबतच का? एवढा त्रास का? शरिर बदलत असतं, सतत एक भिती, मनावर ताण, खेळण्यावर बंधनं सगळंच नविन.. पण मग हळुहळू आवडू लागतं सारं, तिच्यातले ते बदल, ते सुंदर दिसणं, आकर्षक दिसणं, लोकांच लक्ष वेधून घेणारा सौंदर्य आवडू लागतं, मनाचं आणि शरीराचही..आणि आवडू लागतं तिच्यातल्या आईला जपणं.. तिच्यातलं मातृत्व जागवणारा हा बदल..पण ह्या बदलात तिला जपायला हवं, तिला सांभाळायला हवं..

*नव्या वाटा अन् विश्व नवे*

*नाजूक हळवे सारे हवे*

*बदल घडतो शरिरी अन्*

*मनास तिच्या जपणे हवे*

*हा काळ नवासा तिजसाठी*

*ऋतू प्राप्तीचे देणे*

*अवघड जरी तरी हवेहवेसे*

*तिज मातृत्वाचे लेणे*

पुढे काही पावलं ह्या प्रवासात चालल्यावर मात्र आता सरावली आहे, सोनपावलानी सुंदर उजाळल्यावर आता मात्र तिला बाहेरचं जग खुणावतंय.. आपल्या कतृत्वाने आता ती बाहेरचं जग सुद्धा ती गाजवतेय. त्या तेजस्वी वळणाकरता ह्या ओळी..

*सोनपावली जीवनी आली*

*घराचीच ती लक्ष्मी झाली*

*नव्या जगाच्या उंबरठ्यावर*

*तेज तळपते नवे ती ल्याली*

लग्न...

तिच्या आयुष्यातला एक आणखी एक मोठ्ठा बदल! त्याकरता ती तयार होत असतांना आतुन तिचे सगळे स्तर वरखाली होतात. ती सगळ्या भावना ह्यावेळी, एकाचवेळी अनुभवत असते. पण जेंव्हा ती हे नवं जग आपलसं करण्याच्या तयारीत असते तेंव्हा आपलं पाखरू, आपल्या पंखाखालून उडताना बघणं आई वडलांकरता कसं असेल... तर..

*माहेरच्या अंगणी खेळली*

*तू स्वगृही जाशी बाळे*

*तुजवर ठरती नजरा माझ्या*

*अन् भरुन येती डोळे*

*नजरेआड होशील जेंव्हा*

*बनुनी लक्ष्मी नविन कुळाची*

*स्वप्न सुखाचे नयनी*

*मन उंबरठ्यावर भोळे ....*

आता खरी तिची परिक्षा सुरू झालीये, लग्न

झाल्यावर नव विश्व आपलंसं करणं आणि आपलंही थोडं जपणं, आपल्या पूर्व आयुष्यातील अस्तित्व

सांभाळून एक नवी ओळख प्रस्थापित करणं, आणि ह्याच वेळी आपले पंख सगळीकडे पसरवणं हे सारं तिला करायचंय.  स्वबळावर.. आणि ते ही करतेही. काही स्वतःकरता नाही पण येणाऱ्या पिढीकरता तरी नक्कीच करते..

*रणांगणाची रणरागिणी तू*

*अन स्वगृहीची स्वामिनी ही*

*दाही दिशां ह्या तुझ्याच साठी*

*राग नवा अन् रागिणी ही*

ह्या रणांगणावर आपल्या पावलांचे ठसे उमटवणारी ती.. आता मात्र स्थिरावणार, कारण एका नव्या जीवाला ह्या जगात आणण्याचं मोठ्ठ काम तिला करायचंय..त्याला पोषण देणं, त्याला संस्कारित करणं, हे सारं तिला करायचंय.. अर्थात साथ असतेच सगळ्यांची पण नाळ तर इथेच जोडल्या गेलीय... घट्ट.. कायमची..

त्या मातृत्वाकरता काही ओळी..

*असंख्य मरणे जगुनी*

*जन्म नवा तू घेते*

*उदरीच्या अंकुरास मग*

*विश्व नवे तू देते*

*पालनपोषण त्याचे*

*अन् संस्काराची देणी*

*विसरून जीवन सारे*

*तू आई होऊन जाते*

पण खरं बघायला गेलं तर आई ती जन्मापासूनच असते, त्या करता तिला मुल जन्माला घालावं लागतंच असं नाही. तिच्यात हे मातृत्व कायम कुठेतरी दडलेलं असतं आणि पदोपदी ते आपल्याला अनुभवताही हे येतं. बरं आता, मुल झालं, एक जबाबदारी वाढली. पण ह्या घराचा डोलाराही तिला

मुला सारखाच. ह्या घराला उभं करायचं, त्याचं पालनपोषण करायचं, त्यातली नाती जपायची, त्या सगळ्या घराला बांधून ठेवायचं.. हे त्या कर्त्या स्त्रीलाच करावं लागतं. ती खंबीर तर घर खंबीर, ती प्रेमळ तर घर प्रेमळ, नात्यांमधे प्रेम, आनंद.. सगळ तिच्यामुळेच.. पण त्या करता तिलाही खंबीर होणं, स्वतःची काळजी घेणं गरजेच असतं.. ती आहे तर घर आहे..

*तारेवरची कसरत*

*चुल मुल आणि काम*

*सगळ्या गोत्यावळ्यात मात्र*

*हिला नाही आराम*

*आई, सून, बायको मुलगी*

*असंख्य हिच्या बाजू*

*प्रत्येकाच्या ओठी वसते*

*एक हिचेच नाम*

आजी

हा सगळा डोलारा सांभाळत सांभाळत, ती आता अशा वळणावर आली आहे, जिथे तिला आता काही नकोय.. फक्त मनःशांती हवी आहे.. ती तिच्या रजोनिवृत्ती कडे जातेय, मुलं मोठी झालीत, जबाबदारी पेलती झालीत, आता तिला खुणावतंय एक नवं नातं, एक नवी भूमिका..

आजीची..

आजी फक्त नातं असतं, एक विश्वास असतो, आपल्या आयुष्यात एक अशी व्यक्ती आहे जिच्या गाठीला अनुभव आहे, तो अनुभव आणि तिची माया पुरेशी असते आधारासाठी. ती कधी गुपितं जपणारा खजिना असते तर कधी आई वडील आणि आपल्यातला दुवा.. तिचं सगळं अमेझिंग असतं. आणि आजकाल तर आजी ही कुल ही झालीये ... तरी अशी ही आजी

*दूधावरची साय*

*हिची सारी नातवंडं*

*गप्पांमध्ये रंगणे त्यांच्या*

*एवढा एकचं छंद*

*मऊसूत हातांची*

*उब एक कमाल*

*बालपणाशी जीवनाचा*

*हळवा एकच बंध...*

तर अशी ही स्त्रीची आपल्याच अवती भवती फिरणारी, वावरणारी, आपल्याला जपणारी, सांभाळून घेणारी रुपं.. पूर्वीची स्त्री जरा वेगळी होती, बंधनात अडकलेली, पण तरीही अवघं विश्व व्यापणारी.. आता बदललीये खरी.. आणखी व्यापक, सर्व समावेशक झालीये.. सगळ्या कला अवगत झाल्या, सगळ्या विभागात मुक्त पणे वावरणारी, तरीही स्वतःची अस्मिता जपून, सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी, आपले संस्कार आपली मातृभाषा,आपले उत्सव आपले सण पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणारी.. ही स्त्री..

*ना श्वेत कांतीची मशाल हाती*

*ना डौलाचा साज शिरी*

*मी धैर्याचा जन्म नवा अन्*

*धगधगणारा श्वास उरी*

*पाश नकोसा करुणेचा*

*मज आस साथीची असे तरी*

*अल्लड अवखळ तरीही शामल*

*मी अथांग वाहे नदी परी..*

*मी अष्टभुजा शतजन्मीची*

*तोडूनी बंधने उभी जरी*

*माया ममता वात्सल्याची*

*असे नभा सम मुर्ती खरी ...*

# रीत जगाची...

- निता प्रकाश

हे एक विडंबन काव्य आहे, ह्यात कोणाला दुःखवावे असा हेतू नाहीये, मात्र ही एक सत्य घटना होती, जी मी कवितेतून मांडली.

एका दीसी राजे हो, माह्या आलं मनात
मरा व राजे हो, न याव जगात
तवा मंग मी बी कामाले लागलो
अनं जीव देल्ला मंग नदीच्या डोहात.
गर्दीत राजेहो खूप जमली
व्हती
आसवं बी त्यायची दुक्कानं भिजली
व्हती.
आत्मा बनूनशान मंग म्या आलो वर
हूबा राह्यलो तेथं नदिच्या काठावर
पोलिसायनं माह्य पिरेत पाण्यातून काढलं
अनं नेऊनशान चीरघरात दचकन आदयल
म्या मनल यायले नाई काई आरा दुरा
आपल्याच पोलीसकीचा दावतेत मोठा तोरा
मंग मनल घरी रडभूक झाली असन
बायकोतं रडूनशान आदमुशी झाली असंन
मंग मी भराभरा घरी माझ्या गेलो
आड्यावर बसूनशान पीरेत माह्य पाहू लागलो.
मले का नी राजे हो कसं काच वाटे
फालतूच जीव देल्ला आपन असच वाटे
सुतक गितक मंग धा दिसात पार पडलं
तेरवीच्या वक्ती मंग घोडं व्हतं अडलं
कोनी म्हने त्याले लाडू आवडत व्हता
कोनी म्हने त्याले पेढा आवडत व्हता
समद्यायनं मंग समजदारीचा आनला मोठा
ताव
लाडू न पेढ्याईवर मारला मंग ताव
सारं मंग कसं शांत शांत झालं
माह्या बी आत्म्याले लई बरं वाटलं
एका दिसी माही नजर आंगना मंदी गेली
माह्या बायको सारखी बाई तेथी मले दिसली
मंग म्या वाकूनशान जाऊन तेथी पाह्यलं
शेजारच काट्ट मले तेथी दिसलं
सोताले लेकाचं आमिर खान समजे

त्याले पाहून बायको माही नवरी वानी सजे
फोटू समोर माह्या पनत्या व्हत्या   ईझल्या
मंग मातर त्यायले कोनी न्हाई तेवल्या
सारं पाहून मन माह्य खिन्न खिन्न झालं
बरं झालं पिरेत माह्यं जित्त नाई झालं
मंग मी घरामंदी चुपचापशानी गेलो
तसबीर माही उचलून, घेवूनशान आलो
तरी बी घरात काई हाकबोंब नाई झाली
पाहूनशान जगाची रीत, नजर माही नीवली
पाहूनशान जगाची रीत नजर माही निवली

# तशी तू लकी आहेस...

- स्वर्णिमा प्रकाश

दरवेळेस सारखं यावेळेस थेट विषयाला हात न घालता सुरुवातीला थोडक्यात प्रस्तावना देते आणि मग  बाकीचं सांगते. तर दोन- तीन दिवसांपूर्वी सहजच मामाकडे जाणं झालं.  तेव्हा बोलता बोलता माझी आजी मला म्हणाली,  "तशी तू लकी आहेस." त्यावेळी या वाक्याचं मला काहीच वाटलं नाही पण नंतर मात्र डोक्यात फिरत राहिलं. का कुणास ठाऊक पण हे वाक्य माझ्या डोक्यात फिट्ट बसलं. आणि याच विचारचक्रात मग्न असतांना मलाही ते पटलं की येस, तशी मी खूप लकी आहे.

आता का ते सांगते,  त्याआधी परत थोडक्यात प्रस्तावना -  अगदी आत्ताच ८-१० दिवसांपूर्वी  माझं एमएसडब्लू आटोपलं. या एमएसडब्लू च्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात समाजातील असे अनेक घटक जवळून बघता आले ज्यांना सर्वसामान्य माणूस सहसा बघू शकत नाही,  बोलू शकत नाही. पण मला मात्र त्यांच्याशी थेट संवाद साधता आला.  त्यांची परिस्थिती जाणून घेता आली.

माझं 'फॅमिली अँड चाईल्ड स्टडीज'  हे स्पेजलायजेशन असल्यामुळे घरगुती हिंसाचाराच्या विविध केसेस , बाल गुन्हेगारीकडे प्रवृत्त झालेली बालकं, किंवा मग काही कारणास्तव घरच्यांनी टाकून दिलेली मुलं,  देहव्यवसायात अडकलेल्या मुली अशा सगळ्यांसोबत आणि यांच्यासाठी काम करणाऱ्या यंत्रणे बरोबर काम करण्याचं भाग्य मला लाभलं.

त्यांच्या समस्या जाणून घेता आल्या,  त्यांच्या मुळाशी जावून काही समस्यांवर समाधानपूर्वक असा तोडगाही काढता आला. आज जेव्हा यासगळ्या लोकांच्या केसेस ऐकते,  बघते तेव्हा खरंच असं वाटतं की मी खूप लकी आहे किंवा आपण सगळेच खूप लकी आहोत.

कारण,  आपण एका चांगल्या कुटुंबात जन्माला आलोत, आपल्याला चांगलं घर मिळालं, आई-वडील मिळाले जे आपल्याला शिकवून आपल्या पायावर उभं राहण्याचं बळ देतायत. आणि त्याही पलीकडे  आपण स्वतः हाती पायी धड आहोत, आपली बुद्धी शाबूत आहे, तटस्थपणे विचार करण्याची किंवा केलेल्या कृतीचं विश्लेषण करण्याची क्षमता आपल्याकडे आहे.

**आणखी काय हवं हो आयुष्यात?**

**या समाजात असे अनेक लोक आहेत ज्यांना धड दोन वेळेचं अन्न सुद्धा मिळत नाही. पण आपलं ताट मात्र पंच पक्वान्नांनी भरलेलं असतं. नाही? आपल्याकडे असलेली समृद्धी कायमच अशीच राहो, त्यात काही वादच नाही, पण फक्त जे आपल्याकडे आहे ते इतरांकडे नाही याची जाणीव असावी इतकंच.**

**आजकाल आपल्याकडे काय आहे, यापेक्षा आपल्याकडे काय नाही याचीच चर्चा जास्त होते आणि त्यामागे बराच वेळ खर्च होतो. आणि यासगळ्यात आपल्याकडे असलेल्या गोष्टींसाठी कृतज्ञता व्यक्त करणंच राहून जातं. असं म्हणतात की मनुष्य जन्माला येतांना त्याचं नशीब सोबत घेवून येतो. मान्य आहे, नशीब सोबत आणत असला, तरी ते टिकवणं हे मात्र त्याच माणसाच्या हातात असतं.**

**तेव्हा, सुदैवाने आणि आपल्या नशीबाने आपल्याला ज्या-ज्या चांगल्या गोष्टी मिळाल्या आहेत त्याविषयी कृतज्ञता व्यक्त करूया आणि जे काही निसटून गेलं आहे आपल्या हातातून त्यावर फार विचार न करता, याहून उत्तम काहीतरी आपल्याला लाभेल अशी आशा करुयात.**

**कारण... *आपण सगळेच खरंच खूप लकी आहोत!***

# 'नाते' तुझे नी माझे

- दिशा टिकेकर

बाहेर पडणारा धोधो पाऊस आणि हातात मस्त आल्याच्या चहाचा कप घेऊन सखी गाणे ऐकण्यात तल्लीन झाली होती. तेच तिचे नेहमीचे आवडते गाणे ‘ ये राते ये मौसम नदीका किनारा ये चंचल हवा' तसे सखीला गाणे ऐकण्याची व गाणे म्हणण्याची खूप आवड पण हे गाणं तिच्या जास्तच जवळचं होतं.

शिक्षणाची फारशी आवड नसल्यामुळे ग्रॅज्युएट होताच सखीच्या आई-वडीलांनी तिचे लग्न लावून दिले. मुलगा उत्तम घराणे श्रीमंत. अमाप पैसा. कुठलीच कमतरता नाही. घरचाच मोठा बिझनेस तो सांभाळत होता. सोहम नाव त्याचे. त्याला साधी, सरळ व साधारण घरच्याच मुलीशी लग्न करायचे होते. हिच अट त्याची. आणि सखीला बघताच पहिल्याच नजरेत तो तिच्या प्रेमात पडला.

कॉफीचा एक एक घोट घेत सखी पावसाचा आनंद घेत होती. आपणही गाणं शिकावं आणि एक उत्तम गायिका व्हावे असे तिला नेहमीच वाटे. ‘शिकूया का आपण गाणं, तसेही घरात फारसे काहीच काम नाही.’ असा विचार सखीच्या मनात आला. तिने लगेच सोहमला फोन केला आणि आपली इच्छा त्याला सांगितली. सोहमने ही होकार दिला व उत्तम अशा गायन क्लासमध्ये सखीला प्रवेश मिळवून दिला.

सखीचा गायन क्लास सुरू झाला. ती मन लावून शिकत होती. रोज सोहम घरी आल्यावर त्याला गाणं म्हणून दाखवत असे. सोहमला पण सखीचं खूप कौतुक वाटे. तसा सोहम हा फार हौशी नवरा होता. बायकोच्या सगळ्या इच्छा पूर्ण करणारा.

आज सोहम जरा आनंदातच घरी आला.

“सखी, सखी अगं कुठे आहेस तू”

“काय झालं? मी इथेच आहे”

“तुझ्यासाठी सरप्राईज आहे. ओळख बघू”

"अगं,  ओळख तर"

"साडी नाहीतर कानातले किंवा गजरा असे काहीतरी तुम्ही आणले आहे नं?"

"हो,  आणले आहे पण यातील काहीच नाही"

"मग काय ड्रेस आणलाय?"

"बावळट, हे बघ"

"हे काय? हा तर फॉर्म आहे कसला तरी"

"हो, वाच"

"गाण्याची स्पर्धा.  मी स्पर्धेत भाग घेणार"

सखीला खूप आनंद होतो.  तिचा हा आनंद बघून सोहमही खूप खुश होतो.

सखी अगदी मनापासून स्पर्धेच्या तयारीला  लागते.  गाण्याची खूप प्रॅक्टिस करते. सखी तर "मीच जिंकणार" असे सोहमला सांगते.

स्पर्धेचा दिवस येतो. सकाळ पासूनच सखीची धावपळ चालू असते.  कुठला ड्रेस घालायचं? कसे तयार व्हायचे?  ही सखीची पहिलीच स्पर्धा. त्यामुळे उत्साह हा जास्तच होता.  आज तर सोहमने ही ऑफीसला बुट्टी मारली होती.

"चल,  सखी आवरले का तुझे?"

"हो.. झाले, कशी दिसते आहे मी"

सोहम सखीकडे बघतच राहीला

"अरे.. चल ना आता"

स्पर्धेच्या ठिकाणी दोघेही पोहचतात.  अजून २० मिनिटे होती स्पर्धा सुरू व्हायला.  सखीच्या हातात गाण्याची लिस्ट येते.

"कोणत्या नंबरचे गाणे आहे. ९ वा नंबर"

सखी शांतपणे आत बसते. आता गाण्याची स्पर्धा सुरू होते. एकेक जण गाणं म्हणण्यासाठी स्टेजवर जातात. सखी सगळ्यांचे गाणे शांतपणे ऐकत असते.

आता सखीचा नंबर असतो. स्पर्धक क्रमांक ९ सखी इनामदार अशी अनाऊन्समेंट होते. सखी स्टेजवर जाते. एक नजर सगळीकडे फिरवते. म्युझिक सुरु होतं. समोर जज. सखी माईक घेऊन उभी असते. पण.........

समोरची गर्दी, एवढे म्युझिशियन हे बघून सखी खूप घाबरते आणि गाणं विसरते. तिच्या डोळ्यांतून येत असतात फक्त अश्रू धारा.

सखी गाणं न म्हणताच मागे फिरते. या गोष्टीचा तिला फार धक्का बसलेला असतो. असे कसे घडू शकते याचाच ती विचार करते. आपण तर खुप मेहनत घेतली होती. तरी असे का? मी हरली. मी कधीच जिंकू शकत नाही. तसेही आपण आयुष्यात कधीच काही केले नाही आणि करू ही शकणार नाही. असे विचार सखीच्या मनात येत होते. ती पूर्णपणे खचली होती.

सोहम सखीला घरी घेऊन आला. तिला खूप समजावले पण ती काहीच ऐकायला तयार नव्हती. आपल्या आयुष्याला दोष देत होती. तिची ही अवस्था सोहमला बघवत नव्हती. पण सोहमने हार मानली नव्हती. सखीला गाणंच उभं करु शकेल असे त्याला वाटत होते. त्याला सखीला गमवायचे नव्हते. सोहमला तसे गाण्यातील काहीच कळत नव्हते पण आपण मेहनत घेऊन सखीसाठी असे त्याने ठरविले.

सोहम सखी समोर तीचं सगळ्यात लाडक गाणं ‘ ये राते ये मौसम नदी का किनारा’ हे गाणं मुद्दाम चुकीचे म्हणायचा. पण सखी काहीच बोलत नसे. तिनी गाणं ऐकणे आणि म्हणणे सोडून दिले होते. तरी सोहमने आपले प्रयत्न सोडले नाही.

“सखी आपण कुठे फिरायला जायचे का?”

“नको, माझी इच्छा नाही”

“ अगं चल ना. बरेच दिवस झाले आपण कुठेही गेलो नाही”

“बरं चल”

सोहमने सखीला आपल्या एका फार्महाउस वर नेले. खुप रम्य असा परिसर होता. जिथे नजर जाईल तिथे फक्त हिरवळ व बाजूलाच संथपणे वाहणारी नदी.

रात्रीचे शीतल असे चांदणे पडले होते. सोहमने सखीचा हात आपल्या हातात घेतला. मंद अशी वाऱ्याची झुळूक मधून मधून येत होती. सोहमने सखीकडे बघितले आणि “ये राते ये मौसम नदी का

किनारा ये चंचल हवा" हे गाणे म्हणण्यास सुरुवात केली. सखी हळूच सोहमच्या मिठीत गेली. खुप रडली. रडून रडून आपले मन मोकळे केले आणि ती ही सोहम सोबत गाणं म्हणायला लागली.

सखीने आपली प्रॅक्टिस परत सुरू केली. मन लावून गाण्याचा अभ्यास केला. सोहम तिच्या बरोबर होताच. सखीने नव्याने सुरवात केली आहे हे बघून त्यालाही खूप आनंद झाला. त्यानंतर सखीने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि बक्षीसे ही मिळविली. आज तिचे स्वप्न पूर्ण झाले होते एक उत्तम गायिकेचे.

# वसंताची चाहूल...

- वृषाली भुजाडे

हिरवाई माझी फुलते बाई
नव रूप येते काळ्यामाई || ध्रू ||

वसंत येतो पहा
रान झाले हिरवे खरोखरी
फुलापानांनी सौंदर्य नाचले
सप्तरंग हे नवे फुलले
सांगे स्तुती घरोघरी आई || १ ||

झाड बरवे झाले सगळे
घरटी बांधती पक्षी चहूकडे
पक्षी आनंदी किलबिल करती
गवताचे पाते नाच करती
सूर्याची तर तरहाच न्यारी || २ ||

हिरवाई हिरवी दिसे रसरशीत
किलबिल आवाज एक गुंजती || ३ ||

झाले हसरे सर्वांचे चेहरे
मला वाटे प्रसन्न बरवे
फळे खायची मजाच वेगळी
फुले गुंफायची गोष्टच निराळी
आनंदाची साथ राहो क्षणोक्षणी || ४ ||

मातीचा तर सुवास अनोखा
हिरवा इतर फुलन्या योगा
काड्या आईचा शालू वेगळा
लाल , पिवळा , हिरवा , निळा
आंब्याची मोहर पिवळी लाली || ५ ||

निसर्गाचा आनंद मनात साठवत
गाई ,गुरांचा उत्साह बघत
रानमळे ,भाज्या दिसे टवटवीत

# मायग्रेटिंग बर्ड..

- मधुरा कुळकर्णी

गजबजलेली मुंबई आणि त्याच्यातले गजबजलेली शहरे.मुळात पुणे एक म्हटलं की त्याच्यात पिरंगुट पासून देहू पर्यंत सगळं झालं. मुंबई म्हटलं की ठाणे,वाशी, घाटकोपर माटुंगा, नेरळ-माथेरान, अंधेरी पूर्व पश्चिम, दादर... ब्ला ब्ला ब्ला... ठाणे जांभली रोड वरच्या

एका सोसायटीच्या जवळच्या बागेत दोघे बसले होते. थकले भागले होते पण दोघेही पन्नाशीच्या आतले होते. कॉलेज मधलं प्रेम आणि लग्न झाल्यावर नंतर शिक्षण नोकरी करता करता झालेल्या प्रवासाच्या आणि थकव्याचा सवयीने काही फारसा परिणाम त्यांच्यावर केलेला दिसतच नव्हता. जिथे ऑक्सिजन मिळत नाही अशा मुंबईमध्ये आज कदाचित त्यांच्यासाठी एक स्पेशल दिवस होता त्यामुळे फारशी गर्दी सुद्धा नव्हती आणि पुढे संवादांमध्ये नाजूक वळण आलं तर मग रडायला सुद्धा निसर्गाने वाट करून ठेवली होती असं वातावरण. अस्ताला जाणारा सूर्य ती बघत बसली होती. डोळे टपोरे डोळ्यांना लागलेल्या तो चष्मा त्या केशरी रक्तवर्णी प्रतिबिंबाचे परावर्तन त्या काचेतून करत होता. घराकडे परतताना जो आनंद घेऊन माणूस कामाच्या ठिकाणाहून बाहेर पडतो त्याच्यापेक्षा वेगळं काहीतरी जाणवणारा तिला एक पक्षांचा थवा जाताना दिसला.

"अरे हे मायग्रेटिंग बर्डस आहेत ना माधव"???

"होय. पाऊस वगैरे प्रतिकूल परिस्थिती आली की हे पक्षी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी निघून जातात." माधव उत्तरला...

"अगदी आपल्यासारखं"... निर्विकारपणे रमा उत्तरली.

तिच्यासमोर आता सगळा जीवनपट डोकं वर काढायला लागला होता.

कॉलेजमध्ये कॉलेज क्वीन असलेल्या मानसीचा असलेला सायकॉलॉजीचा विषय आणि एक तर तिचं नाव मानसशास्त्र आणि मानसी यांच्या वरून माधव तिला कॉलेजमध्ये भरपूर चिडवायचा. त्याच्या चिडवणूक मध्ये एक मैत्री होती म्हणून तिला सुद्धा ते फिशपाँड आवडायला लागले. माधवला मात्र इतिहासाचं असलेलं प्रचंड वेड आणि व्यासंग बघून रमाला दिल तो पागल

पागल है मधल्या माधुरीचा कोणीतरी आपल्यासाठी असतंच याचा अर्थाचा डायलॉग आठवायचा.. पदवी घेतल्यावर दोघांनी घरी सांगायचं ठरवलं आणि परिस्थिती बघून लग्न सुद्धा केलं. माधवने तिचं नाव बदलून रमा ठेवलं. पण माधवराव पेशव्यांसारखं जिएंगे तो साथ साथ मरेंगे तो साथ साथ असलं काहीबाही तो बोलायचा त्यावेळी तिच्या मनात भरून यायचं . पराक्रमाचा पत्ता नाही आणि चाललाय देह ठेवायला असती तर तडकून म्हणायची चिडली की. दोघांनी पगाराचे पैसे साठवून साठवून अगदी मुंबईसारख्या ठिकाणी हक्काचं घर उभं केलं. दोघांचे घरटे उभारला होता हक्काचं. दोन वर्षांनी नव्या घरात बाळ येणार म्हटल्यावर तर दोघांच्याही आनंदाला पारावार उरला नाही. माधव आणि दोघांच्या घरच्यांनी सर्व तिचं कौतुक केलं. दिवस भरले तसे माधवने जराही मागचा पुढचा विचार न करता एका महिन्याची रजा टाकून बाळाची आणि तिची सोबत करायची ठरवली.

मुलगा झाला...समीर नाव ठेवलं... विष्णुसहस्रनामतलं २२३वे नाव... आपल्या आवडत्या पुरुषाशी लग्न करणे आणि त्याचं बाळ वाढवणं हा यापलीकडे आनंद काय असतो? हे सर्व ती अनुभवत होती

मुलगा थोडा मोठा झाला की नोकरी करायची असं तिच्या मनात होतं परंतु आपण पुन्हा एकदा आई होणार आहोत हे लक्षात आल्यावर तिने माधवला हे सांगितलं. मुंबईसारख्या ठिकाणी एकाच्या नोकरी मध्ये कसं एवढं सगळं भागायचं असा प्रश्न पडला परंतु समीर साठी दोघांनी हे दिव्य करायचं ठरवलं. मुलगी झाली... कुटुंब पूर्ण झालं. मुलांचे शिक्षण वगैरे सर्व नीट करायचं या हिंमतीने दोघे पुन्हा उभे राहिले होते. समीर आणि मुलीची जबाबदारी दोघे मिळून पार पाडत होते.माधव आता माधव राव झाला होता कारण अहो बाबा म्हणायची सवय मुलांना लागावी म्हणून तिचा हा प्रयत्न होता. गीत रामायण दोघांना आवडायचं त्यावेळी

'शरयू तिरी उभी आयोध्या मनू निर्मित नगरी' या ओळीप्रमाणे मुलीचं नाव त्यांनी शरयु ठेवलं...

समीर आणि शरयू शाळेत जायला लागले. जोडगोळी पाहून दोघांना अगदी त्यांच्या कष्टाचं चीज झाल्यासारखं वाटायचं. बघता बघता मुंज आणि समीरची दहावी पण झाली. अभियांत्रिकी कॉलेजची फी सुद्धा दोघांनी मुलांच्या शिक्षणासाठी भरली. कारण समोर डोळ्यासमोर एकच होतं मुलांचे सर्व नीट व्हावं. समीरला नोकरी लागली आणि नंतर लग्नही झालं. शरयू शिकत होती. दोघे जरा आता कुठे स्थिरावले पण समीर म्हणाला की त्याला एक मुलगी आवडली आहे आणि तो लग्न करेल तर तिच्याशीच. कौटुंबिक परिस्थिती वगैरे बघून दोघांनी होकार दिला मुलाचं सुख शेवटी महत्त्वाचं होतं पण येणाऱ्या सुनेने येताच...

'वायली चूल' हा हट्ट सुरु केला. दादर ला एक फ्लॅट भाड्याने घेऊन दोघे तिथे राहू लागले. समीर च्या संसाराला बहर येऊन त्यालाच जुळ्या मुली झाल्या. रमा च्या आनंदाला पारावर उरला नाही. यथावकाश शरयू चं लग्न झालं. जावई मनाने फार चांगले होते त्यामुळे मुलगी सुखी राहील या स्वप्नाने दोघे निवांत झाले...

आता मुंबई बाहेर कुठेतरी फिरायला जाऊया असं रमा त्याला म्हणायला लागली आणि जरासं सार विसरून दोघे केरळला जाऊन आले. असलेल्या पैशाचा उपभोग त्यांना खाणे-पिणे आणि कधीतरी कपडे याच्या पलीकडे कधी घेताच आला नव्हता. दोघे परत आले तेव्हा मात्र दोघांनाही धक्का बसला की समीरने पैशांची मागणी केली कारण तो जिथे भाड्याने राहत होता तो फ्लॅट घ्यायचा होता. समीर च्या जुळ्या मुलींच्या ओढीने माधवने बँकेमध्ये असलेली एफडी मोडली आणि पैसे सुपूर्त केले. आता त्याच्या नवीन हक्काच्या घरी जायचं आणि हा फ्लॅट विकून म्हातारपण आनंदात घालवायचं असे स्वप्न दोघे पाहायला लागले पण घराचं काम करायचं आहे तुम्ही काही दिवस तिथेच राहा नंतर आपण एकत्र राहू असं समीर म्हणायला लागला.. हे नुसतं आठवलं आणि बसल्या जागी रमा चे डोळे भरून आले.

रमा भानावर आली. पक्षी मार्गस्थ झाले होते. माधव सुद्धा शून्यातच बघत बसला होता. पण तिचं वाक्य ऐकल्यावर मात्र भानावर आला आणि हो आपण आहोत मायग्रीटिंग बर्ड्स म्हणाला. प्रचंड काळजी घेऊन संस्कारांची शिदोरी देऊन सुद्धा वादळ आपल्या आयुष्यात आलेच परंतु आता आपण आपला स्वाभिमान सोडून मायग्रेट करायचं नाही हा विचार त्याच्या मनात रुंजी घालत असताना त्याने रमा चा हात पकडला.

चल उठ...

हं...हो चला...क्षीण आवाजात रमा म्हणाली...

कॉलेजमध्ये असताना नाटकात काम करायचा तसा माधव धीर गंभीर होत म्हणाला...

" स्थलांतर करणारा पक्षी प्रत्येकामध्ये असतो. आणि एक स्टेज संपली की माणसाची सहन करण्याची क्षमता संपते.भावना आपल्या मुलांमध्ये गुंतत राहिल्या परंतु त्यांनी आपल्याला अंतर कधी दिलं हे आपल्याच लक्षात आलं नाही. मुलीच्या संसारात आता लुडबूड करण्यात अर्थ नाही.घरटं किमान स्वतःच्या मालकी हक्काचे करायचे हा बोध तरी देवाने आपल्याला दिला आपण नशीबवान आहोत गं रमा...

नाहीतरी आभाळा मध्ये उडणाऱ्या पक्षांकडे बघ संसार वाढवताना पाणी ऋतूप्रमाणे प्रणयगंध फुलवताना या पक्षांना आपल्याला कधीही स्थलांतर करावं लागेल याचा गंधही नसेल...

खरंय...रमा उत्तरली...

आभाळातले पक्षी केव्हाच

मायग्रेट झाले होते. मुंबईसारख्या गजबजलेल्या स्वप्नांच्या आकाशात मात्र पुन्हा एकदा हे दोन पक्षी आपापल्या घरट्याकडे परतत होते. मला फक्त आता इच्छा एकच होती

'दो हंसो का जोडा बिछड गयो रे' हे असं होऊ नये...

विचारांचं स्थलांतर केलं होतं..


www.tichapaan.com